# शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचे कार्यालय

१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, पुणे -१

दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२५६९६ फॅक्स क्रमांक ०२०२६१२२२१७

ई मेल आय.डी.क्रं dydepune@gmail.com

वेब साईट क्रमांक www.dydepune.com


जा.क्र.उमाशि-२/तक्रार/पुवि/२०१४ /१९९०५/०९

दिनांक :- /८/२०१४

26 AUG 2014

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे, सोलापूर व अहमदनगर

विषय :- राज्यातील कायम विना अनुदानीत परवानगी दिलेल्या (इंग्रजी माध्यमाच्या शाळांना जोडून असलेली उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय वगळून) उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय व वर्ग/तुकडया यांचे ऑनलाईन प्रणालीद्वारे मुल्यांकन करणेबाबत.(सन २०१४-१५)

संदर्भ :- १) शासन निर्णय क्रं. माशाअ/२००९/(५९९/०९)/माशि १, दि. १५/११/२०११
२) शासन निर्णय क्रं. संकीर्ण/२०१२/(१५०/१२)/माशि १, दि. १६/७/२०१३
३) शासन निर्णय क्रं. एचएससी-१८११/(४३१/११)/एसएम-३, दि. २६/२/२०१४
४) शासन निर्णय क्रं. एचएससी-१८११/(४३१/११)/एसएम-३, दि. ४/६/२०१४
५) शासन निर्णय क्रं. धोरण-१०१४/प्र.क्र.१४१/एसएम-३, दि. १४/८/२०१४
६) मा.शिक्षण संचालनालयाकडील पत्र क्रं. उच्च माध्य-२४३/ऑनलाईन मूल्यांकन/ १४-१५/७३१६ दिनांक १९/८/२०१४

उपरोक्त विषयाचे संदर्भीय पत्र क्रं. ६ कृपया पहावे. सन २०१४-१५ मध्ये राज्यातील विनाअनुदानीत परवानगी दिलेल्या (इंग्रजी माध्याच्या शाळांना जोडून असलेली उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालये वगळून) उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालये व वर्ग / तुकडया यांचे ऑनलाईन प्रणालीद्वारे मुल्यांकन करणेबाबतची कार्यवाही दिनांक २१/८/२०१४ ते २०/९/२०१४ पर्यंत संचालनालयाच्या www.mahdoesecondary.com या संकेतस्थळावर सुरु करण्यात येत आहे. सदर प्रणालीमध्ये संदर्भ क्रं. ३ च्या शासन निर्णयान्वये नमूद केलेल्या सर्व विनाअनुदानीत परवानगी दिलेल्या (इंग्रजी माध्याच्या शाळांना जोडून असलेली उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालये वगळून) उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालये व वर्ग / तुकडया यांच अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्यात याव्यात. सदर चे मूल्यांकन सन २०१३-१४ वर्षातील अभिलेख्यांवर करण्यात यावे. सोबत ऑनलाईन प्रणालीद्वारे शाळा मूल्यांकन करण्याबाबत वेळापत्रक दिलेले आहे. आपल्या जिल्हयामधील सर्व स्थानिक वर्तमानपत्रात मोफत निवेदन प्रसिध्दीस देण्यात यावे.

सदर परिपत्रक www.dydepune.com या कार्यालयाच्या या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे.

(बाळासाहेब ओव्हाळ)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे १ करिता

प्रत माहितीस्तव सविनय सादर

१. मा. आयुक्त (शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे १

२. मा. शिक्षण संचालक, (माध्य व उच्च माध्य)
शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे १

शिक्षण संचालनालय
(माध्यमिक व उच्च माध्यमिक),
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, डॉ.ॲनी बेझंट रोड, पुणे ४११ ००१
दूरध्वनी : (०२०) २६१२ १३ १४/९६
फॅक्स : (०२०) २६१३ २१ ४५
e-mail : doesecondary@gmail.com
wbsite : www.mahdoesecondary.com

**महत्वाचे/कालमर्यादित**

क्र.उच्च माध्य-२४३/ऑनलाईन मूल्यांकन/१४-१५/ ५३५६
दिनांक. : १९-८-२०१४

प्रति,

सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद,
सर्व शिक्षण निरिक्षक, बृहन्मुंबई

**विषय : राज्यातील कायम विनाअनुदानीत परवानगी दिलेल्या (इंग्रजी माध्यमाच्या शाळांना जोडून असलेली उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालये वगळून) उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालये व वर्ग / तुकडया यांचे ऑनलाईन प्रणालीद्वारे मुल्यांकन करणेबाबत. (सन २०१४-१५)**

संदर्भ : १) शासन निर्णय क्र.माशाअ/२००९/(५९९/०९)/माशि १, दि.१५.११.२०११
२) शासन निर्णय क्र.संकीर्ण/२०१२/(१५०/१२)/माशि १, दि.१६.७.२०१३
३) शासन निर्णय क्र. एचएससी-१८११/(४३१/११)/एसएम-३, दि. २६.२.२०१४
४) शासन निर्णय क्र. एचएससी-१८११/(४३१/११)/एसएम-३, दि. ४.६.२०१४
५) शासन निर्णय क्र.धोरण-१०१४/प्र.क्र.१४१/एसएम-३, दि. १४.८.२०१४

उपरोक्त विषयी संदर्भाधीन शासन निर्णय पहावेत.

सन २०१४-१५ मध्ये राज्यातील विनाअनुदानीत परवानगी दिलेल्या (इंग्रजी माध्यमाच्या शाळांना जोडून असलेली उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालये वगळून) उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालये व वर्ग / तुकडया यांचे ऑनलाईन प्रणालीद्वारे मुल्यांकन करणेबाबतची कार्यवाही **दि.२१.०८.२०१४ ते २०.०९.२०१४ पर्यंत** संचालनालयाच्या www.mahdoesecondary.com या संकेतस्थळावर सुरु करण्यात येत आहे. सदर प्रणालीमध्ये संदर्भ क्र. ३ च्या शासन निर्णयान्वये नमूद केलेल्या सर्व विनाअनुदानीत परवानगी दिलेल्या (इंग्रजी माध्यमाच्या शाळांना जोडून असलेली उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालये वगळून) उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालये व वर्ग / तुकडया यांचे अर्ज ऑनलाइन पध्दतीने भरण्याबाबतच्या सूचना संबंधित उच्च माध्यमिक शाळांच्या / कनिष्ठ महाविद्यालयांच्या प्राचार्य / मुख्याध्यापक यांना देण्यात याव्यात. सदरचे मूल्यांकन सन २०१३-१४ वर्षातील अभिलेख्यांवर करण्यात यावे. आपल्या विभागात/जिल्हयामध्ये याबाबत स्थानिक सर्व वर्तमानपत्रात मोफत निवेदन प्रसिध्दीस देण्यात यावे.

**ऑनलाईन प्रणालीव्दारे शाळा मूल्यांकन करण्याबाबत वेळापत्रक पुढीलप्रमाणे राहील.**

| अ.क्र. | बाब | करावयाच्या कार्यवाहीचा कालावधी |
|---|---|---|
| १ | शासन निर्णय क्र. एचएससी-१८११/(४३१/११)/एसएम-३, दि. ४.६.२०१४ व शासन निर्णय क्र धोरण-१०१४/प्र.क्र.१४१ /एसएम-३, दिनांक १४.८.२०१४ मध्ये नमूद केलेल्या सूचनेनुसार www.mahdoesecondary.com या संकेतस्थळावर ऑनलाईन प्रणालीव्दारे शाळांनी अर्ज सादर करणे. | दि.२१.०८.२०१४ ते २०.०९.२०१४ |
| २ | ऑनलाईन माहिती भरलेल्या शाळेने हार्ड कॉपी चार (४) प्रतीत शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद यांचेकडे सादर करणे. | दि.२५.०९.२०१४ पर्यंत |
| ३ | शा.नि.दि.१५.११.२०११ मधील मुद्दा क्र.७ मध्ये नमूद केल्यानुसार अध्यक्ष, शाळा मुल्यांकन समिती तथा संबंधित जिल्हयाचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी ऑनलाईन प्रणालीव्दारे प्राप्त झालेले प्रस्ताव लोकांच्या हरकती मागविण्यासाठी www.mahdoesecondary.com या संकेतस्थळावर अपलोड करणे. | दि.०५.१०.२०१४ |
| ४ | लोकांकडून हरकती मागविण्याचा कालावधी | दि.०६.१०.२०१४ ते २०.१०.२०१४ |
| ५ | दिनांक ०६.१०.२०१४ ते २०.१०.२०१४ या कालावधीत हरकती प्राप्त झाल्यास त्याबाबत शाळा मूल्यांकन समितीने निर्णय घेणे. ऑनलाईन मध्ये पात्र ठरलेल्या शाळांची शाळा मूल्यांकन समितीने छाननी/तपासणी करुन शाळांनी दिलेल्या माहितीची खातरजमा करावी. चार प्रतीमध्ये स्वीकारलेल्या प्रस्तावावर शासन निर्णय दि.४.६.२०१४ व १४.८.२०१४ मधील निकषानुसार मूल्यांकन करुन गुणदान करणे. | दि.२१.१०.२०१४ ते ३०.१०.२०१४ |
| ६ | शाळा मूल्यांकन समितीने प्रस्ताव तपासून पात्र व अपात्र शाळांची स्वतंत्र यादी वस्तुनिष्ठ कारणासहीत विहित नमुन्यामध्ये तपासणी समिती तथा संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांचेकडे हार्डकॉपी व सॉफ्टकॉपीमध्ये सादर करणे. | ०१.११.२०१४ |
| ७ | तपासणी समितीने मूल्यांकनासाठी प्राप्त झालेल्या एकूण अर्जापैकी २० टक्के अर्ज तपासणे | २.११.२०१४ ते १०.११.२०१४ |
| ८ | शासन निर्णय दिनांक १५.११.२०११ मधील परिच्छेद ९ मध्ये नमूद केल्यानुसार आपल्या विभागातील मूल्यांकनानंतर अनुदानासाठी **पात्र शाळांची यादी** शासनाकडे सादर करणे. | १२.११.२०१४ |

उपरोक्त प्रमाणे शाळा मूल्यांकनाचे वेळापत्रकाची अंमलबजावणी होईल याची दक्षता घेण्यात यावी.

**(सर्जेराव जाधव)**
शिक्षण संचालक
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)

प्रत : १) मा. सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२) मा. खाजगी सचिव, मा. मंत्री, शालेय शिक्षण यांचे कार्यालय
३) मा. खाजगी सचिव, मा. राज्यमंत्री, शालेय शिक्षण यांचे कार्यालय
४) कक्ष अधिकारी (एसएम ३) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.